## आदेश नि.क्र.०५ खाली

वादी यांनी सदरचा दावा हा कायमच्या मनाई हुकूमाकरीता सादर केला आहे. वादींतर्फे ॲड. श्री. यु. व्ही. जाधव यांनी असा युक्तीवाद केला की, वादी हे वादातील गट क्रं. १३९ या जमीनीचे मालक व ताबेदार आहेत. प्रतिवादी क्रं. १ ची जमीन गट क्रं. १३८ मध्ये आहे आणि प्रतिवादी क्रं. १ ते १४ यांची जमीन गट क्रं. १४० मध्ये आहे व ते त्यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत सौर प्रकल्प उभारणीचे काम करीत आहेत. प्रतिवादी हे सदरचे बांधकाम करीत असताना वादींची जमीन गट क्रं. १३९ या मध्ये येवून संरक्षण भिंत बांधण्याच्या प्रयत्नात आहेत. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी यांनी वादींच्या गट क्रमांकात संरक्षण भिंतीचे बांधकाम केल्यास वादींचे नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादीं विरुध्द एकतर्फा अंतरिम तात्पुर्ता मनाई हुकूम देण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. वादींच्या वादपत्राचे, तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाचे आणि दस्ताऐवजांचे अवलोकन केले. परंतु, प्रतिवादींना न ऐकता एकतर्फा अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश पारीत केल्यास ते न्यायोचित होणार नाही. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम का देण्यात येवू नये अशी कारणे दाखवा नोटीस प्रतिवादींना काढण्यात यावी.
२. प्रकरणाची नोटीस परतीची तारीख ०९/११/२०२० नेमण्यात येते.
३. वादींची मागणी असल्यास तातडीची प्रक्रीया शुल्क मंजुर करण्यात येते.

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2020.11.03 17:24:40 +0530

दिनांकः०३/११/२०२०

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.